|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## पितृ भजन पितृअष्टक

जयांच्या कृपेने या कुळी जन्म झाला पुढे वारसा हा सदा वाढविला
अशा नम्र स्मरतो त्या पितरांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || १ ||

इथे मान सन्मान सारा मिळाला पुढे मार्ग तो सदा दाखविला
कृपा हीच सारी केली तयांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || २ ||

मिळो सद् गती मज पितरांना विनती हीच माझी त्रिदेवतांना
कृती कर्म माझ्या मिळो मोक्ष त्यांना  नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ३ ||

जोडून कर हे विनती तयांना अग्नि वरूण वायु आदी देवतांना
सदा साह्य देवोनी उध्दरी पितरांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ४ ||

वसुरूद्रदित्य स्वरूप पितरांना सप्तगोत्रे एकोत्तरशतादी कुलांना
मुक्तीमार्ग द्यावा ऊध्दरून त्यांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ५ ||

करूनी सिध्दता भोजनाची तयांना पक्वान्ने आवडीनें बनवून नाना
सदा तृप्ती होवो जोडी करांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ६ ||

मनोभावे पुजूनी तिला, यवाने विप्रास देऊन दक्षिणा त्वरेने
आशिष द्याहो आम्हा सकलांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ७ ||

सदा स्मृती राहो आपुलीच आम्हा  न्यून काही राहाता माफी कराना
गोड मानुनी घ्यावे सेवा व्रतांना नमस्कार साष्टांग त्या पूर्वजांना || ८ ||


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com